औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या मंगळवार दिनांक २६/५/१९९२ रोजी होणा-या ७३ व्या सभेपुढील विषय.

---

विषय क्र. १: दिनांक २७.३.९२ रोजी झालेल्या ७२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

बाब टिप्पणी

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकासमंडळाने दिनांक २७.३.९२ रोजी झालेल्या ७२ व्या सभेत खालील प्रमाणे निर्णय घेतले होते ते निर्णय कायम करण्याकरिता मंडळाच्या विचारार्थ सादर केले आहेत.

...

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या दिनांक २०:३:९२ रोजी झालेल्या ७२ व्या सभेचा कार्यवृत्तांत.

सभेस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

१] मा. श्री. ईश्वर भोसीकर — सभापती/औरंगाबाद मंडळ

२] श्री. विजय देशपांडे — उपसभापती/औ. मं.

३] श्री. व्यंकटराव देशपांडे उर्फ बबरु चारठाणाकर — सदस्य

४] श्री. दे. हि. मुन, उपसंचालक, नगररचना व मुल्यनिर्धारण विभाग, औरंगाबाद. — सदस्य

५] श्री. राजभोज, कार्यकारी अभियंता, [म. न. पा. औरंगाबाद] [आयुक्त म. न. पा. औरंगाबाद] — यांचे सदस्य प्रतिनिधी.

विषय क्र. १: दिनांक २९. २. ९२ रोजी झालेल्या ७१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

मंडळाच्या ७१ व्या बैठकीतील विषय क्र. ३ व ठराव क्र. ४३१ वर चर्चा करतांना उपसभापतींनी अशी माहिती दिली की, मंडळाच्या मागील बैठकीत सदर विषयावर मंडळाने असा निर्णय घेतला होता की, लातूर येथील गाळ्यासाठी पुरेशी मागणी प्राप्त न झाल्यास गाळ्याच्या योजनेऐवजी भूखंडाची योजना घेण्यात यावी व तद्नंतर भूखंडासाठी जाहिरात देण्यांत यावी.

यापुढे उपसभापतींनी मंडळास माहिती दिली की, उपाध्यक्ष/प्राधिकरण याचे सुचनेवरुन दिनांक २०. ३. १९९२ रोजी सदर योजनेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी लातूर यांच्या सभागृहात एक सभा आयोजित करण्यांत आली होती.

या बैठकीसाठी औरंगाबाद गृहनिर्माण मंडळाचे सभापती, मुख्याधिकारी जिल्हाधिकारी लातूर, नगरसेवक, शासकीय व निमशासकीय कर्मचा-यांच्या संघटनेचे प्रतिनिधी हजर होते व त्या बैठकीत गृहनिर्माण योजनेची माहिती देण्यांत आली. उपस्थित संघटनेच्या प्रतिनिधींनी सदर गृहनिर्माण योजनेस प्रतिसाद देण्याचे मान्य केले व इच्छुक कर्मचा-यांची यादी देण्याचे ठरले. यावेळेत मंडळाचे असे मत झाले कीं, तुर्त गाळ्यांची योजनाच ठेवावी व अर्ज विक्री व स्विकृतीची मुदत वाढवून देण्यांत यावी.

26 LIG
30 MIG } [illegible]
on the basis of demand

ठराव क्र. ४३४

दिनांक २९. २. ९२ रोजी झालेल्या ७१ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने सदरच्या कार्यवृत्तांतास मान्यता दिली.

विषय क्र. २: गाळयाच्या वाढीव किंमतीला मंजूरी देण्याबाबत.

स. न. ४५ शाहानुरवाडी औरंगाबाद येथील उच्च उत्पन्न गटातील ४३ गाळयांची योजना.

. . . . . .

ठराव क्र. ४३५

१. या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, उच्च उत्पन्न गटातील ४३ गाळयांच्या योजनेवर जो अतिरिक्त भूविकास खर्च [ड्रेनेज लाईन-विद्युत पुरवठयासाठी] झालेला आहे तो या योजनेत व्यापारी वापरासाठी ठेवलेल्या भूखंडावर कांही प्रमाणात टाकावा जेणे करुन गाळयांची किंमत कमी होण्यास मदत होईल.

२. मा. सभापती/औ. मं. यांच्या सुचनेप्रमाणे गाळयांची किंमत कमी होण्याच्या दृष्टीने मुख्य अधिकारी व मुख्य लेखा अधिकारी/औ. मं. यांनी शक्य असेल तेथे कमी करण्याचे प्रयत्न करावेत.

विषय क्र. ३: गाळयांच्या वाढीव किंमतीला मंजूरी देण्याबाबत.

स. न. ४५ शाहानुरवाडी औरंगाबाद येथील अल्प उत्पन्न गटातील १५० गाळयांची योजना.

ठराव क्र. ४३६

स. न. ४५ शाहानुरवाडी औरंगाबाद येथील अल्प उत्पन्न गटातील १५० गाळयांच्या वाढीव किंमतीबाबत मंडळाने खालील प्रमाणे निर्णय घेतला.

१. अल्प उत्पन्न गटातील १५० गाळयांच्या योजनेवर जो अतिरिक्त भूविकास खर्च [ड्रेनेज लाईन-विद्युत पुरवठयासाठी] झालेला आहे तो या वसाहतीत असलेल्या व्यापारी भूखंडावर कांही प्रमाणात टाकावा. गाळयांची किंमत कमी होण्यास मदत होईल.

२. सदर योजनेतील गाळयांची किंमत कमी करण्याच्या अनुषंगाने ~~मंडळ~~ मुख्य अधिकारी व मुख्य लेखा अधिकारी यांनी या प्रकरणी लक्ष घालावे असे सभापती व मंडळाचे सदस्य यांनी सुचविले.

विषय क्र. ४:- असाधारण परिस्थितीत केलेल्या वैद्यकीय खर्चाची परिपुर्ती करणेबाबत.

ठराव क्र. ४३७

श्री. एम. व्ही. बारसे रोनिओ शिपाई यांची पत्नी सौ. हौसाबाई या दिनांक २५.८.९१ ते ३.९.९१ पर्यन्त डॉ. अशोक बगडीया यांचे रूग्णालयात बाळंतपणामध्ये स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र यांचेशी संबंधीत असलेल्या आजारामुळे भरती झालेल्या होत्या, त्याकरिता त्यांना एकंदरीत रू. १५००/- खर्च आला. प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वानुसार त्यांना रू. १५०० एवढी रक्कम देय आहे. करिता त्यांना रू. १५००/- त्यांना अदा करण्यास मंडळाने मान्यता दिली.

विषय क्र. ५: मा. सभापतीच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.

विषय क्र. १: गाळा क्र. १४ डीआरटी रविंद्रनगर नांदेड हा सुनिल झुंबरलाल करवा यांचे नावे वर्ग करण्याबाबत.

ठराव क्र. ४३८

सदर बाब टिप्पणीवर चर्चा होऊन गाळा क्र. डीआरटी १४ नांदेड हा गाळा व्यापारी वापराकडून निवासी वापराकडे वर्ग करण्यास व सदर गाळा जिल्हा मध्यवर्ती ग्राहक संस्था नांदेड या संस्थेच्या नांवावरून श्री. सुनिल झुंबरलाल करवा यांचे नांवे करण्यास [नियमाप्रमाणे अधिमुल्य [शास्ती] आकारून] मंडळाने मान्यता दिली.

मा. सभापतीच्या परवानगीने सभा संपली.

प/१९५९२